# आसमंत फाऊंडेशनतर्फे विविध रोपांचे मोफत वितरण



▶ रत्नागिरी

येथील आसमंत बेनवोलन्स फाउंडेशनतर्फे विविध संस्था, शाळांच्या आवारात लावण्याकरिता औषधी व विविध प्रकारच्या वनस्पतींचे मोफत वितरण करण्यात येत आहे. याकरिता संस्थांनी एमआयडीसी येथील आसमंत ट्री पार्क येथे संपर्क साधावा, असे आवाहन आसमंतचे संस्थापक नंदकुमार पटवर्धन यांनी केले आहे.

संस्थेतर्फे पिंपळ, कदंब, अर्जुन, टेटू, बहावा, औदुंबर, बेहेडा, हिरडा, पुत्रजीवी आदी झाडांची रोपे देण्यात येणार आहेत. आसमंत बेनेवोलन्स फाऊंडेशन संस्था निसर्ग पर्यावरण रक्षणासाठी गेल्या सात वर्षांपासून कार्यरत आहे. उद्योजक नंदकुमार पटवर्धन यांनी संस्थेची स्थापना केली. निसर्गाचे आपण काही देणं लागतो या भावनेतून त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले.

आसमंततर्फे खारफुटी संवर्धनासाठी समुद्र, खाडीकिनारी भागात लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी रोपवाटिका बनवण्यात येणार आहे. लागवडीकरिता खारफुटी मँग्रूव्ह सोसायटी ऑफ इंडियाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत आहे. तसेच खारफुटी आणि बांबू वनस्पतीवर संशोधन, अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला प्रोत्साहन देण्यात येईल. पीएचडी किंवा तत्सम संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. तसेच शैक्षणिक वेतन व संशोधनासाठी लागणारा खर्च आसमंततर्फे देण्यात येणार आहे.

एमआयडीसी येथे तीन वर्षांपूर्वी संस्थेने भाडेतत्त्वावर सहा एकर जागा घेतली. त्यामध्ये वनस्पती उद्यान साकारले आहे. यात विविध प्रकारच्या देशी व औषधी वनस्पतींची लागवड केली आहे. ही झाडे आता मोठी होऊ लागली असून येथे अनेक प्रकारचे पक्षी पाहायला मिळतात. ऑक्टोबरपासून वनस्पती उद्यानात मुलांसाठी पर्यावरण जागृतीसंदर्भात नावीन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येणार आहेत. तसेच पक्षी निरीक्षण, वनस्पतींवर संशोधन करण्याकरिता विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे.

ट्री पार्कमध्ये विविध किटक, पक्षी यावेत, त्यांचा अधिवास वाढावा व यातून निसर्गाचा समतोल राखण्यास हातभार लागावा हा हेतू आहे. यंदा या उद्यानात नवीन झाडे लावण्यात येणार आहेत. तसेच लवकरच सीडबँक सुरू करण्यात येणार आहे. पुढील वर्षापासून देशी वनस्पतींची रोपे येथे उपलब्ध होतील. निसर्गप्रेमी व अभ्यासकांसाठी हे वनस्पती उद्यान खुले करण्यात येणार आहे. भविष्यात विद्यार्थी व लोकसहभागाने पारंपरिक जलस्रोत, झरे व नद्या स्वच्छ करून जलसंवर्धन करणे आदी उपक्रम हाती घेण्याचा संस्थेचा मानस आहे, अशी माहितीही पटवर्धन यांनी दिली.